## निशाणी क्र. ३० वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी यांनी वादीचे निशाणी २३ वरील पुराव्याचे प्रतिज्ञापत्र रद्द करावे अशी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादी यांनी दाव्यात मुद्दे काढण्यात आलेले नसतानाही मुद्दे काढण्यात आले आहे असे समजून निशाणी १८ अन्वये पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले होते. सदर दाव्यात त्यानंतर मुद्दे काढण्यात आले. मुद्दे काढल्यानंतर वादी यांनी नविन शपथपत्र दाखल करण्याची परवानगी मिळावी म्हणुन निशाणी २२ वर अर्ज दाखल केला तो अर्ज न्यायालयाने मंजुर केला. प्रतिवादी पुढे असे कथनकरतो की, वादी यांना निशाणी २२ प्रमाणे अर्ज देण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार नाही. पुर्वीचे शपथपत्र कायम ठेवून नविन शपथपत्र देण्याची कायद्यात तरतुद नाही. वादी उलटतपासाचे दरम्यान निशाणी २३ कडे दाखल केलेल्या सरतपासावर उलटतपास देत आहेत. वादी यांनी अतिरिक्त सरतपास देण्याची परवानगी मागून त्यानंतर अतिरिक्त सरतपास देणे आवश्यक होते. त्यामुळे वादी यांचा निशाणी २३ वरील पुरावा रद्द करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

०३. वादी यांनी निशाणी ३१ अन्वये आपले म्हणणे दाखल केले. त्यांनी प्रतिवादीच्या अर्जातील कथने खोटी व खोडसाळ असल्याचे नमुद केले. वादी पुढे असे कथन करतो की, वादी यांनी निशाणी २३ वरील पुराव्याचे शपथपत्र न्यायालयाची पुर्व परवानगी घेतल्यानंतर दाखल केले आहे. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०४. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. दाव्यातील अभिलेखाचे निरिक्षण केले असता असे निदर्शनास येते की, वादी यांनी या दाव्यात मुद्दे काढण्यापुर्वी संभाव्य मुद्दे दाखल केले होते. त्यानंतर मधल्या काळात वादीचा दावा मुद्दे काढण्याकामी प्रलंबित होता. संभाव्य

मुद्दयांच्या प्रतिला न्यायालयाने काढलेले मुद्दे समजून वादी यांनी निशाणी १८ वरील पुराव्याचे प्रतिज्ञापत्र अनावधानाने दाखल केल्याचे दिसते. सदर दाव्यात दि. १४/०६/२०२२ रोजी या न्यायालयाने मुद्दे काढले. पुराव्याचे निशाणी १८ वरील प्रतिज्ञापत्र मुद्दे काढण्यापुर्वी दाखल केल्याचे निदर्शनास आल्यानंतर वादी यांनी नविन प्रतिज्ञापत्र दाखल करण्याची परवानगी मिळावी म्हणुन निशाणी क्र. २२ वर अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज हा मंजुर करण्यात आला आहे. निशाणी १८ वरील पुराव्याचे प्रतिज्ञापत्र हे दावा चौकशीला लागण्यापुर्वी अनावनधानाने दिल्यामुळे त्याला केवळ वादीचे प्रतिज्ञापत्र म्हणुन गृहित धरता येईल. निशाणी १८ वरील प्रतिज्ञापत्रातील कथनांवर प्रतिवादी हे उलटतपास घेऊ शकतात. निशाणी २३ वरील वादीचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र हे दाव्यात मुद्दे काढल्यानंतर दाखल झालेले असल्यामुळे दाव्याचा निकाल मुद्दयांच्या अनुषंगाने गुणदोषावर होण्याकरीता हे प्रतिज्ञापत्र पुरावा म्हणुन वाचणे आवश्यक आहे. अशापरिस्थीतीत प्रतिवादीचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2023.03.20 18:31:51 -0800

खालापूरः (आर.डी.वाबळे)

दि. २०/०३/२०२३ दिवाणी न्यायाधिश क.स्तर खालापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b) | Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C., Khalapur |
| (c) | Date of Judgment/Order | :20/03/2023 |
| (d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | :20/03/2023 |
| (e) | Judgment/Order uploaded on | :23/03/2023 |